International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr- 2022

# विविध कालखंडातील भारतीय स्त्री जीवनातील स्थित्यंतरे : स्थान व दर्जाचा आढावा

**पाटील रविंद्र अमृत[1] प्रा. बरडे सुवर्णा साहेबराव[2]**

[1]संशोधक विद्यार्थी, बी.एस.डब्ल्यू., एम.एस.डब्ल्यू., सेट, नेट.

[2]सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, जि. धुळे.

**प्रस्तावना :**

भारतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रियांना नेहमी दुय्यम दर्जाचे स्थान दिले आहे. कौटुंबिक, सामाजिक, आर्थीक, राजकिय व धार्मिक अशा सर्व व्यवस्था स्त्रियांचे शोषण करतात. स्त्रियांना शिक्षण व धार्मीक अधिकार नाकारण्यात आला होता. चूल-मूल, रांधा, वाढा व खरकटी काढा या स्वरूपात स्त्रिला बांधून ठेवण्यात आले होते. नर-नारी ही व्यवस्था नैसर्गिक आहे, मात्र पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत लिंग आधारित भेदभाव मुद्दाम केला जातो. पुरूषी विचारसरणीने स्त्रीचे माणूसपण नाकारून स्त्रिची दयनिय स्थिती निर्माण केली आहे. आजची परिस्थिती बदललेली असली तरी महिलांच्या समस्या / प्रश्न आजही संपलेले नाहीत. आजच्या आधुनिक युगातील महिला एकीकडे रूढी, परंपरा, कर्मकांड यांच्यात जखडत चालल्या आहेत. तर दुसरीकडे जागतीकीकरणाच्या झगमगटात स्त्रियांचे वस्तूकरण होत आहे. म्हणून भारतीय स्त्री जीवनाचे अध्ययन करत असतांना विविध कालखंडातील स्त्री जीवनाचा आढावा घेणे अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

**संशोधनाचे उद्देश :**

१) भारतीय स्त्री जीवनात विविध कालखंडानुसार घडुन आलेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करणे.

२) भारतीय पुरुषप्रधान समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान व दर्जाचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती :**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी संशोधनकर्त्याने माहिती व तथ्य मिळविण्याकरिता दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे .दुय्यम स्त्रोतातील माहिती ही दुसऱ्या व्यक्तींची व लिखीत स्वरूपात असते .या पध्दतीतून विषयासंबंधीत महत्वपूर्ण माहितीचे संकलन करण्यात आले आहे त्यासाठी .ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र इ.साधनांचा वापर करण्यात आला आहे .

**विविध कालखंडातील स्त्री जीवन :**

**१) वैदिक कालखंड :**

वैदिक काळात समाजात स्त्रियांना गौरवपूर्ण व स्वतंत्र स्थान प्राप्त झाले होते. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान अधिकार होते. मुलांप्रमाणे मुलींचे ही उपनयन होत असे. वेदांतील कित्येक ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत. स्त्रिया यज्ञात भाग घेत असत. वेदाध्यन, विद्याभ्यास, कलाशिक्षण, वादन, गायन, नृत्ये इ. शिकण्यास पुर्ण परवानगी होती. केशवपण, सतीप्रथा, बालविवाह, पडदा पध्दत या प्रथा त्या काळात नव्हत्या. मुलींना पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विधवा स्त्री पुनर्विवाह करु शकत असे.

वैदिक काळात गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी, लोपमुद्रा, देवयानी, सुलभा या स्त्रिया ब्रह्मवादिनी होत्या. तसेच अरूंधती, कौशल्या, तारा, कुंती, गौतमी या सद्योव्दाहा स्त्रियांनी वेद अध्ययन केले होते.

२) **स्मृती कालखंड :**

स्मृती काळात स्त्रियांच्या स्थान व दर्जात घसरण झाली. तिचे सर्व अधिकार काढून घेण्यात आले. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती'... शिक्षणाच्या अधिकारावर बंधने आली तसेच अनेक बंधने घालण्यात आली. पुरूषांच्या बरोबरीचे स्थान नाकारण्यात आले. ह्या काळात स्त्रियांची रती व जन्म देणे ही दोन महत्वाची कर्तव्य मानण्यात आली. स्त्रियांनी पुरूषांच्या अधीन असले पाहिजे, यासाठी काही नियम देखील बनविण्यात आले होते.

३) **जैन धर्म :**

जैन धर्माची दारे स्त्रियांसाठी सुरूवातीपासूनच खुली होती. जैन धर्माची भुमिका स्त्रियांच्या बाबतीत समतेची व आदराची होती. जैन धर्माने स्त्रियांना दिक्षा घेण्याचा अधिकार व धर्म प्रसारात स्थान दिले होते. ह्या धर्मातील महिलांना शिक्षणाचा अधिकार दिला होता. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले होते.

४) **बौध्द धर्म :**

गौतम बुध्दांनी अखिल मानव जातीला समतेचा मार्ग दाखविला. स्त्रियांसाठी हा काळ आशादायी होता. बुध्दांनी स्त्रियांना बौध्द धर्माची दिक्षा दिली. त्यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र 'भिक्षुणी संघ'ची स्थापना केली होती. बुध्दांनी विवाहित, अविवाहित, विधवा, वेश्या या सार्‍याच वर्गातील स्त्रियांना बौध्द धर्माचे दारे खुली केली. बौध्द काळात सामाजिक व धार्मीक क्षेत्रात स्त्रियांना मानाचे स्थान होते. बौध्द धर्माने स्त्रियांमधील आत्मविश्वास व आत्मसन्मान जागृत केला होता.

सुभद्रा, अमरा, उदुम्बरा, भद्रा-कुंडा-केशा, जयंती, सुमेधा, अनोपमा, खेमा इ. प्रसिध्द भिक्षुणी होत्या. ज्या ज्ञान, विद्वता आणि तर्कशास्त्रात पारंगत होत्या.

५) **मौर्य कालखंड :**

मौर्य काळातील स्त्रियांची स्थिती तुलनेने समाधानकारक होती. या काळात त्यांना बरेच स्वातंत्र्य होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. स्त्रियांना पुनर्विवाह आणि नियोग करण्याची परवानगी होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार विवाहासाठी स्त्रीचे वय १२ वर्षे आणि पुरुषाचे वय १६ वर्षे असावे. मौर्य काळातील स्त्रिया हेर म्हणून, सम्राटाचे अंगरक्षक म्हणून कार्य करित असत.

६) **मध्ययुगीन कालखंड :**

हा कालखंड स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय अंधारमय होता. इ.स. ५०० नंतर समाजातील स्त्रियांचे स्थान सतत घसरत गेले. स्त्रियांचे स्वातंत्र या काळात नाहिसे झाले. सततच्या मुस्लिम आक्रमणांमुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेची समस्या निर्माण झाली. त्यातून बालविवाह, सती प्रथा, जौहर, हुंडा पध्दत, दास प्रथा व पडदा पध्दतीचा उदय झाला. विवाह झाल्यानंतर सासरी आलेल्या मुली तिरडीनेच बाहेर

पडायच्या. सामाजिक रूढी, परंपरा जाचक बनून स्त्रियांच्या सामाजिक जीवनावर मर्यादा आल्या, याचा परिणाम स्त्री शिक्षणावर झाला. शिक्षण व वेदाध्यन नाकारण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचा विकास खुंटला.

या कालखंडामध्ये राजघराण्यात चांद बिबी, रझिया बेगम, नूरजहॉ, हजरत महल, कर्णवती, दुर्गावती इ. कर्तबगार महिला होऊन गेल्या.

७) **वारकरी संप्रदाय :**

मध्ययुगीन अंधारमय युगात वारकरी संप्रदायाने भक्तीची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यात स्त्री-पुरूष असा भेदभाव नव्हता. वारकरी संप्रदायाने धार्मीक व सांस्कृतिक कार्यात स्त्री व पुरूषांना समान स्थान दिले होते. मध्ययुगीन काळातील मुक्ताबाई, जनाबाई, विठाबाई, कान्होपात्रा, मीराबाई इ. संत स्त्रियांनी अभंग रचनेतून स्त्रीच्या आध्यात्मिक मुक्तीची कल्पना मांडली.

८) **शिव कालखंड :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात स्त्रियांचा दर्जा उंच होता. त्यांना सन्मानाने वागविले जाई. मात्र ह्या काळात सती प्रथा काही प्रमाणात अस्तित्वात होती असे दिसते. उच्च वर्गातील स्त्री वर्गास लिहण्या-वाचण्याचे स्वातंत्र होते. मात्र सर्वसामान्य स्त्रिया या अशिक्षीत होत्या. शिवकाळात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई यासारख्या कर्तबगार महिला होऊन गेल्या.

९) **पेशवे कालखंड :**

पेशवे काळात स्त्रियांची स्थिती खालावलेली दिसते. वेदाध्ययन, धार्मीक संस्कार व शिक्षणापासून स्त्रियांना वंचित ठेवले गेले. सती प्रथा, बालविवाह, बाल-जठर विवाह अशा प्रथा सर्रास सुरू होत्या.

या कालखंडामध्ये राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, भीमाबाई होळकर अशा कर्तबगार महिला होऊन गेल्या.

१०) **ब्रिटीश राजवटीचा कालखंड :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आलेल्या प्रबोधन युगाने स्त्री उद्धाराचा विचार व कार्याला गती मिळाली. त्यात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, म. फुले, म. गांधी, गोपाळ हरी देशमुख, आगरकर, न्या. रानडे, महर्षी कर्वे, महर्षी वि.रा. शिंदे इ. समाजसुधारकांनी सतीबंदी व बालविवाह प्रतिबंध, विधवा पुनर्विवाह, केशवपनाला विरोध, स्त्रीशिक्षण, विधवाश्रम इ. बाबतीत कार्य केलेले दिसून येते. स्त्री प्रश्नांबाबत २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत अनेक समाजसुधारकांनी वैचारिक व कृतिशील चळवळी उभ्या केल्या. पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी अशा कर्तबगार स्त्रियांनी या काळात स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचे कार्य केले होते.

ब्रिटीशांनी देखील स्त्रियांच्या प्रश्नांबाबतीत अनेक कायदे केले होते. उदा. सती बंदी कायदा १८२९, विधवा पुनर्विवाह कायदा १८५६, बाल विवाह प्रतिबंध कायदा, १९२९ इ.

११) **स्वातंत्रोत्तर कालखंड :**

स्वातंत्र्यानंतर भारताने कल्याणकारी राज्याचे धोरण स्विकारले. राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान अधिकार दिलेत. स्त्रियांसाठी अनेक कायदे, कार्यक्रम, योजना सुरू करण्यात आल्या. त्यामुळे अनेक प्रकारची

स्वातंत्र त्यांना प्राप्त झाली आहेत. महिला आयोग स्थापन करण्यात आला. स्त्री शिक्षणावर भर देण्यात आला. त्यांच्या आर्थीक स्वावलंबनासाठी अल्प दरात कर्ज पुरवठा केला जात आहे. वडिलांच्या संपत्तीत मुलीला समान अधिकार प्राप्त झालेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५०% आरक्षण देण्यात आले. बाल विवाह, बहुविवाह, केशवपन, हुंडा प्रथा यासारख्या अनेक अनिष्ठ रूढी-परंपरांना पायबंद घालण्यात आला.

अनेक संस्था, संघटना स्त्रियांच्या प्रश्नांवर कार्य करित आहेत. त्यांना त्यांचे हक्क व न्याय मिळवून देत आहेत. त्यामुळे आजची स्त्री सक्षम व आत्मनिर्भर होत आहे.

**सारांश :**

विविध कालखंडामधील भारतीय स्त्री जीवन, त्यांचे स्थान व दर्जात सातत्याने बदल होत गेले आहेत. काही कालखंडामध्ये त्यांना सन्मानपुर्वक वागणूक मिळाली तर काही कालखंड हे स्त्रियांच्या दृष्टीने निराशाजनक होते. आज नव्या व्यवस्थेने स्त्री-पुरुष समानतेच्या कितीही गप्पा मारल्या तरीही सद्यपरिस्थितीत देखील समानता दिसुन येत नाही.

**निष्कर्ष व सूचना :**

१) प्रत्येक कालखंडामध्ये पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम स्थान दिलेले दिसून येते.

२) समाजातील स्त्रियांचे स्थान व दर्जा उंचावण्यासाठी त्यांना शिक्षणाबरोबरच आर्थीकदृष्ट्या स्वावलंबी केले पाहिजे.

३) स्त्रियांना त्यांच्याविषयक कायदे, हक्क व अधिकारांविषयी जागृत करुन स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित केली पाहिजे.

४) घटनात्मक व कायद्यात्मक तरतुदी, महिला धोरण आणि त्यांच्याविषयक शैक्षणिक व राजकिय आरक्षण धोरणांची योग्य अंमलबजावणी करुन महिलांचे सक्षमीकरण घडवून आणले पाहिजे.

**संदर्भ सूची :**

१) आंबेडकर बाबासाहेब, (२००९), हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, पुणे, सुगावा प्रकाशन.

२) कवि माधवी, (१९९९), महिला कल्याण आणि विकास, नागपूर, विद्या प्रकाशन.

३) गंगवार ममता, (२००९), इतिहास के आईनें में महिला सशक्तीकरण, कानपुर, सरस्वती प्रकाशन.

४) देशपांडे शीला द., (२०११), कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

५) पांगुळ-बारहाते नंदा, (२०१४), महिलांवरील लैगीक अत्याचार, नागपूर, आर. बी. प्रकाशन.

६) पाटील लिला, स्त्री जीवनाचे चित्तवेध, कोल्हापूर, चैतन्य प्रकाशन.

७) मेहेत्रे स्मीता, (२०११), भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

८) लांजेवार ज्योती, (२००५), भारतीय समाज व स्त्री, पुणे, सुगावा प्रकाशन.

९) शिंदे ताराबाई, (१८८२), स्त्री-पुरुष तुलना, पुणे, शिवाजी छापखाना.

१०) साने गीता, (१९९७), भारतीय स्त्रीजीवन, मुंबई, मौज प्रकाशन गृह.

११) साळुंखे आ.ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, मुंबई, लोकवांडमय गृह.

१२) हाटे चंद्रकला, (१९८०), स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.